Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त परभणीत सद्भावना शपथ

(पान २ वर)



। शुक्रवार , दि. २१ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ । अंक १३३ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

## Selected

### कोरेगाव प्रकरणातील मुख्य फिर्यादी सुरेश सकट यांचे निधन

**पुणे :** भीमा-कोरेगाव येथील हिंसाचाराच्या प्रकरणात मुख्य फिर्यादी व साक्षीदार म्हणून भूमिका बजावलेले सुरेश सकट यांचे आज निधन झाले. त्यांच्या निधनाने सामाजिक वर्तुळात हळहळ व्यक्त होत आहे भीमा-कोरेगाव येथील घटनेनंतर न्यायासाठी सुरू असलेल्या लढ्यात सुरेश सकट अग्रणी राहिले होते. या संघर्षादरम्यान त्यांनी घरदार गमावल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या अल्पवयीन मुलगी पूजा सकट हिच्या मृत्यूचाही उल्लेख त्यांच्या कुटुंबाच्या संघर्षाच्या संदर्भात केला जातो.दीर्घकाळ न्यायासाठी लढा देऊनही प्रकरणाचा अंतिम निकाल त्यांच्या हयातीत लागला नाही. त्यामुळे न्यायाची प्रतीक्षा आणि संघर्षाच्या आठवणी मागे ठेवून त्यांचे निधन झाल्याने समर्थक व अनुयायांमध्ये दुःख व्यक्त होत आहे.

### नाशिकच्या पालकमंत्रीपदी निवडीनंतर गिरीश महाजन

# महाजन यांचे जळगावात जल्लोषात स्वागत!

## कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला; महापौर दीपमाला काळे यांच्या हस्ते भव्य गुलाबहार घालून सत्कार

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी निवड झाल्यानंतर राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री तथा जळगावचे नेते गिरीश महाजन यांचे जळगाव शहरात आगमन होताच भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्त्यांकडून जल्लोषात स्वागत करण्यात आले.**

जळगाव रेल्वे स्थानक परिसरात कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली ोती. घोषणाबाजी, पुष्पवृष्टी आणि उत्साहपूर्ण वातावरणामुळे रेल्वे स्थानक परिसराला उत्सवाचे स्वरूप आले होते.गिरीश महाजन यांचे रेल्वे स्थानकावर आगमन होताच उपस्थित कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत त्यांचे स्वागत केले. यावेळी जळगावच्या महापौर दीपमाला काळे यांच्या हस्ते महाजन यांना भव्य गुलाबहार घालून नाशिकच्या पालकमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले. तसेच उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुष्पगुच्छ देत त्यांना शुभेच्छा दिल्या. नाशिकसारख्या महत्त्वाच्या जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी गिरीश महाजन यांच्यावर सोपविण्यात आल्याने जळगावातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला.



यावेळी 'गिरीश भाऊ आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं' तसेच 'भारतीय जनता पार्टीचा विजय असो' अशा घोषणांनी रेल्वे स्थानक परिसर दणाणून गेला.

महाजन यांच्या नेतृत्वाखाली जळगाव जिल्ह्याच्या राजकीय व विकासात्मक वाटचालीला सातत्याने दिशा मिळाली असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. आता जळगावसोबतच नाशिक जिल्ह्याची जबाबदारी मिळाल्याने त्यांच्या समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या स्वागतावेळी भाजप पश्चिम महानगर जिल्हाध्यक्ष डॉ. राधेश्याम चौधरी, महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, भाजप गटनेते प्रकाश बालाणी, नगरसेवक ॲड. शुचिता हाडा, अरविंद देशमुख, सुरेखा तायडे, गायत्री राणे, विशाल भोळे, राजेंद्र घुगे पाटील, तसेच महानगर सचिव विशाल त्रिपाठी यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, नगरसेवक, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नव्या जबाबदारीबद्दल कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

नाशिकच्या पालकमंत्रीपदाची नवी जबाबदारी मिळाल्यानंतर जळगावात झालेल्या या उत्स्फूर्त स्वागताने गिरीश महाजन यांच्याविषयी कार्यकर्त्यांमध्ये असलेला उत्साह पुन्हा अधोरेखित झाला. रेल्वे स्थानकावरील गर्दी, घोषणांचा गजर, पुष्पवृष्टी आणि भव्य गुलाबहारामुळे महाजन यांचे जळगाव आगमन राजकीयदृष्ट्या लक्षवेधी ठरले.आगामी सुनावणीत शिंदे गटाच्या वतीने या युक्तिवादाला काय प्रत्युत्तर दिले जाते आणि न्यायालय कोणते निर्देश देते, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

नाशिकसारख्या महत्त्वाच्या जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी गिरीश महाजन यांच्यावर सोपविण्यात आल्याने जळगावातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. यावेळी 'गिरीश भाऊ आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं' तसेच 'भारतीय जनता पार्टीचा विजय असो' अशा घोषणांनी रेल्वे स्थानक परिसर दणाणून गेला. महाजन यांच्या नेतृत्वाखाली जळगाव जिल्ह्याच्या राजकीय व विकासात्मक वाटचालीला सातत्याने दिशा मिळाली असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

# इस्लामाबादच्या कृत्याला दिल्लीचे प्रत्युत्तर: पाकिस्तान हाय कमीशनबाहेर बुलडोझर कारवाई

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली |** भारत आणि पाकिस्तानमधील राजनैतिक संबंधांमध्ये पुन्हा एकदा तणाव वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. नवी दिल्ली येथील पाकिस्तान हाय कमीशनबाहेर भारतीय प्रशासनाकडून मोठी कारवाई करण्यात आली असून, परिसराबाहेरील अनधिकृत बांधकामे आणि सुरक्षा बॅरिकेड्स बुलडोझरच्या साहाय्याने हटवण्यात आले आहेत. इस्लामाबादमधील भारतीय उच्चायोगाबाहेर केलेल्या कारवाईला जशास तसे प्रत्युत्तर म्हणून या पावले उचलल्याची चर्चा कूटनीतिक वर्तुळात रंगली आहे. कारवाईमागची मुख्य कारणे:



* अनधिकृत बांधकामांवर हातोडा: नवी दिल्लीतील पाकिस्तान हाय कमीशनच्या व्हिसा सेक्शनजवळ परिसराच्या निर्धारित सीमेबाहेर काही अनधिकृत ढाचे आणि शेड्स उभारण्यात आले होते, जे प्रशासनाने काढून टाकले.

* सुरक्षा साहित्य हटवले: हाय कमीशनच्या बाहेर सुरक्षेच्या नावाखाली लावण्यात आलेले ट्रॅफिक बोलार्ड, लोखंडी बॅरिकेड्स आणि अवरोधक हटवून परिसर मोकळा करण्यात आला.

* इस्लामाबादला सडेतोड उत्तर: काही दिवसांपूर्वी पाकिस्तानने इस्लामाबादमधील भारतीय उच्चायोगाबाहेर उभे केलेले पार्किंग पोल आणि सुरक्षा अवरोधक हटवले होते. त्याच कृतीची पुनरावृत्ती करत भारताने दिल्लीतून हे प्रशासकीय पाऊल उचलले आहे.

कूटनीतिक संबंधांवर परिणाम: भारत आणि पाकिस्तानमधील बिघडलेल्या संबंधांच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या परस्पर प्रशासकीय कारवाया यापूर्वीही घडल्या आहेत. भूतकाळात दोन्ही देशांनी आपापल्या राजनैतिक मिशनमधील कर्मचारी संख्या कमी करणे, व्हिसा मिळवण्याच्या अटी कडक करणे आणि नियंत्रण वाढवण्यासारखे कठोर निर्णय घेतले आहेत. सध्या या कारवाईवर दोन्ही देशांच्या अधिकृत यंत्रणांकडून कोणतीही सविस्तर टिप्पणी आलेली नाही, परंतु राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर या घटनेची जोरदार चर्चा सुरू आहे.

# धूरखेडातील ३५ कुटुंबांच्या पुनर्वसनाचा प्रश्न!

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** रावेर तालुक्यातील धूरखेडा येथील ३५ कुटुंबांच्या पुनर्वसनाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, या कुटुंबांनी न्यायाच्या मागणीसाठी जळगाव येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. दरम्यान, पुनर्वसनासाठी पूर्वी अयोग्य ठरविण्यात आलेल्या जागेचा आग्रह जिल्हा प्रशासनाकडून धरला जात असल्याचा आरोप करत समता सैनिक दलाने या भूमिकेची सखोल व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. सन २०१० मध्ये उपविभागीय अधिकारी, हातनूर प्रकल्प पुनर्वसन उपविभाग, मुक्ताईनगर यांच्या सर्वेक्षणात ३५ कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी प्रस्तावित करण्यात आलेली जागा योग्य नसल्याचे नमूद करण्यात आले होते. त्यानंतर पुनर्वसनासाठी दुसऱ्या योग्य जागेचा प्रस्ताव तयार करण्यात आला. या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर भूसंपादनाची रक्कम उपविभागीय अधिकारी, फैजपूर यांच्याकडे जमा करण्यात आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. मात्र, मंजूर प्रस्तावानुसार योग्य जागा उपलब्ध असतानाही अयोग्य ठरविण्यात आलेल्या दुसऱ्याच जागेवर पुनर्वसन करण्याचा आग्रह प्रशासनाकडून धरला जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या भूमिकेला ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. समता सैनिक दलाची आंदोलनस्थळी भेट या पार्श्वभूमीवर समता सैनिक दलाच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन आमरण उपोषण करणाऱ्या ३५ कुटुंबांशी चर्चा केली. यावेळी त्यांच्या समस्या, मागण्या तसेच पुनर्वसनासंदर्भातील उपलब्ध कागदपत्रे व माहिती जाणून घेण्यात आली. मंजूर प्रस्तावातील योग्य जागा उपलब्ध असताना अयोग्य जागेचा आग्रह का धरला जात आहे, याची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी समता सैनिक दलाने केली आहे. या आहेत प्रमुख मागण्या ३५ कुटुंबांचे पुनर्वसन मंजूर झालेल्या योग्य जागेवरच करावे.

### जि.प. शाळेला करिश्मा नायर यांची सदिच्छा भेट

**रावेर |** जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती करिश्मा नायर यांनी रावेर तालुक्यातील वाघोदा बुद्रुक येथील जिल्हा परिषद शाळेला भेट देत शाळेची पाहणी केली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता बडबुजर तसेच शिक्षक रामेश्वर कांदे, वैशाली चौधरी, रूपाली बोंडे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी श्रीमती नायर यांचे स्वागत केले. मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी शाळेतील शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थ्यांची उपस्थिती तसेच शाळेतील विविध सुविधांची पाहणी केली. यावेळी त्यांनी शिक्षकांशी संवाद साधून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती घेतली.

# पारोळ्यात ग्रामसेवकाच्या मृत्यूचा निषेध; ग्रामसभांवर बहिष्कार

## ग्रामसभांसाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांची पर्यायी सचिव म्हणून नियुक्ती करण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

**जळगाव| प्रतिनिधी:** पारोळा तालुक्यातील शिरवे ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेचे कामकाज सुरू असताना ग्रामपंचायत अधिकारी स्व. पी. एन. पाटील यांच्यावर झालेल्या हल्ल्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटनेचा महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन, डि.एन.ई. १३६, यावल शाखेने तीव्र निषेध केला आहे. ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाल्याचा आरोप करत यावल तालुक्यातील ग्रामसेवकांनी १८ ऑगस्ट २०२६ पासून अनिश्चित काळासाठी ग्रामसभांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भात युनियनच्या वतीने तहसीलदार मोहनमाला नाझीरकर तसेच गटविकास अधिकारी डॉ. मंजुश्री गायकवाड यांना निवेदन देण्यात आले. ग्रामसभांच्या कामकाजासाठी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांऐवजी अन्य विभागातील अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांची पर्यायी सचिव म्हणून नियुक्ती करावी, अशी प्रमुख मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर शिरवे ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेचे कामकाज पार पाडत असताना स्व. पी. एन. पाटील यांच्यावर हल्ला झाला. या घटनेत त्यांचा मृत्यू झाल्याने ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत ग्रामसभेचे कामकाज करताना कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेची हमी मिळणे आवश्यक असल्याचे युनियनने म्हटले आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या राज्य कार्यकारिणीच्या निर्देशानुसार या घटनेच्या निषेधार्थ ग्रामसभांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. 'पर्यायी सचिव नियुक्त करा' युनियनच्या मागणीनुसार, १८ ऑगस्ट २०२६ पासून पुढे होणाऱ्या ग्रामसभांमध्ये ग्रामपंचायत अधिकारी सचिव म्हणून कामकाज करणार नाहीत. जळगाव जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमध्ये यापुढे होणाऱ्या ग्रामसभांसाठीही ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना सचिव म्हणून उपस्थित न ठेवता अन्य विभागातील अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची पर्यायी सचिव म्हणून नियुक्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत ठोस उपाययोजना होईपर्यंत हा निर्णय कायम ठेवण्यात येणार असल्याचे युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. निवेदन देताना युनियनचे सचिव हितेंद्र महाजन, अध्यक्ष शिवाजी सोनवणे, उपाध्यक्ष रविंद्र बाविस्कर, कायदेविषयक सल्लागार बाळू वायकोळे यांच्यासह आनंद सुरवाडे, सुबोध सोये, प्रविण चौधरी, प्रकाश तायडे, प्रलेश वानखेडे, प्रताप बोदडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# अखिल महाराष्ट्र राज्य रेडिओ श्रोता संमेलन छत्रपती संभाजीनगरमध्ये उत्साहात

## आकाशवाणी केंद्रप्रमुखांसोबत खुल्या संवादातून श्रोत्यांनी मांडल्या अडचणी

जन सम्राट टाईम्स

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी:** रेडिओच्या सुवर्णकाळापासून आजच्या आधुनिक युगापर्यंत रेडिओशी असलेले नाते जपणाऱ्या श्रोत्यांचा अखिल महाराष्ट्र राज्य रेडिओ श्रोता संमेलन छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. रेडिओ श्रोता दिनानिमित्त १९ व २० ऑगस्ट रोजी साखरे मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या या दोन दिवसीय संमेलनाला महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतून सुमारे २०० रेडिओ श्रोत्यांनी उपस्थिती लावली. दरवर्षी २० ऑगस्ट हा रेडिओ श्रोता दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त राज्यस्तरीय रेडिओ श्रोता संमेलन दरवर्षी वेगवेगळ्या जिल्ह्यात आयोजित केले जाते. मागील वर्षी



हे संमेलन अहिल्यानगर येथे झाले होते. यंदा छत्रपती संभाजीनगर येथे संमेलनाचे आयोजन करण्यात आले. परभणी, नांदेड, बीड, सोलापूर, धाराशिव, जालना, अहिल्यानगर, पुणे, जळगाव, धुळे, अमरावती, नागपूर, वाशिम आदी जिल्ह्यांतून रेडिओप्रेमी श्रोते मोठ्या संख्येने सहभागी झाले. विविध आकाशवाणी केंद्रांचे निवेदक, आर.जे. (रेडिओ जॉकी) व उद्घोषक यांनीही संमेलनाला उपस्थिती लावली. रेडिओच्या कार्यक्रमांवर ज्येष्ठ श्रोत्यांची विचारमंथन संमेलनाच्या पूर्वसंध्येला विविध जिल्ह्यांतून आलेल्या ज्येष्ठ रेडिओ श्रोत्यांनी एकत्र येत रेडिओ केंद्रांची सद्यस्थिती, कार्यक्रमांचे स्वरूप आणि भविष्यात प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांबाबत सविस्तर चर्चा केली. रेडिओ केंद्रांनी कोणत्या प्रकारचे कार्यक्रम प्रसारित करावेत, श्रोत्यांच्या अपेक्षा काय आहेत, यावर विचारविनिमय करण्यात आला. श्रोत्यांच्या या चर्चेतील मुद्दे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी भविष्यात प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. सुरेश जाधव, प्रकाश बोरगावकर, अशोक पाटील, सय्यद जलालभाई, धोंडीरामसिंग राजपूत, बाहुबली फुरसुले, नसीर शेख, मारुती भोसले, डॉ. नामदेव भुतेकर, मारोतराव पांचाळ, दशरथ सागुते, सय्यद युनूस, आप्पासाहेब जाधव, अमोल निकम आदी ज्येष्ठ श्रोत्यांनी चर्चेत आपले विचार मांडले.आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्राचे केंद्रप्रमुख सुजित बनसोडे, वृत्तविभाग प्रमुख समरजीत ठाकूर आणि सिनेस्टार उदय माळी यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. केंद्रप्रमुख सुजित बनसोडे यांनी उपस्थित श्रोत्यांशी खुला संवाद साधत त्यांच्या अडचणी, सूचना व अपेक्षा जाणून घेतल्या. भविष्यात आकाशवाणी केंद्रावर श्रोत्यांच्या अपेक्षेनुसार विविध दर्जेदार कार्यक्रम सादर करण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. खुल्या संवादात श्रोत्यांनी मांडल्या समस्या खुल्या संवादाच्या माध्यमातून श्रोत्यांनी आकाशवाणीच्या कार्यक्रमांबाबतच्या आपल्या अपेक्षा आणि विविध समस्या मांडल्या. शिवदास गलांडे, गजानन बारस्कर, रवींद्र कुडाळकर, गोविंद पिसाळ, मारुती भोसले, अशोक दळे, सुरेश जाधव, नारायणदेव घुगे, सुनील मुंगसे यांच्यासह अनेक श्रोत्यांनी सहभाग घेतला. यावेळी सर्व श्रोत्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या प्रतिक्रिया व अनुभवही जाणून घेण्यात आले.

वंचितांचा, शोषितांचा निर्भीड आवाज

दैनिक जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल...


डिजिटल युगात वेगवान, निर्भीड आणि सत्याला प्राधान्य देणारे दैनिक जन सम्राट टाईम्स!

तुम्हालाही पत्रकारितेची आवड आहे का?
समाजातील प्रश्न मांडण्याची जिद्द आहे का?
तुमच्या परिसरातील बातम्या जगापर्यंत पोहोचवायच्या आहेत का?

मग हीच तुमच्यासाठी सुवर्णसंधी!

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका आणि गावासाठी वार्ताहर / प्रतिनिधी पाहिजेत

अनुभव असो वा नसो
– उत्साह आणि प्रामाणिकपणा महत्त्वाचा
डिजिटल पत्रकारितेचे प्रशिक्षण व मार्गदर्शन उपलब्ध
तुमच्या आवाजाला मिळेल राज्यभर व्यासपीठ



संपर्क करा (Call / WhatsApp)
+91 93254 87889 / 9270187889
- संपादक -
मुकुंदराव शामराव नंन्नवरे
ईमेल : Jansamrattimes@gmail.com -
वेबसाईट : https://jansamrattimes.in
आजच संपर्क करा...
तुमचा आवाज बना जनतेचा आवाज!

# केंद्राच्या शैक्षणिक धोरणाविरोधात विद्यार्थी मोर्चाचे आंदोलन

## समान शिक्षण व्यवस्था, पेपरफुटीला आळा आणि शिक्षण संस्थांचे खासगीकरण थांबविण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** केंद्र शासनाच्या शैक्षणिक धोरणासह शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी भारतीय विद्यार्थी मोर्चा आणि भारत मुक्ती मोर्चाच्या वतीने जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. भारतीय संविधानाने नागरिकांना दिलेल्या शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

राष्ट्रीय शिक्षण धोरणामुळे गोरगरीब, वंचित आणि बहुजन घटकातील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिक्षणाच्या संधींवर परिणाम होत असल्याचा दावा संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केला. शिक्षण सर्वांसाठी समान आणि सुलभ राहावे, तसेच शिक्षण क्षेत्रातील वाढते खासगीकरण थांबवावे, या प्रमुख मागण्यांसाठी देशभरातील जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर आंदोलन करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

भारतीय विद्यार्थी मोर्चाचे राष्ट्रीय संरक्षक तथा भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांच्या निर्देशानुसार हे आंदोलन तीन टप्प्यांत आयोजित करण्यात येत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. त्यातील दुसऱ्या टप्प्यांतर्गत जळगाव येथे आंदोलन करण्यात आले. प्रद्युम्न वारडे, देवानंद निकम यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झालेल्या आंदोलनाचे नेतृत्व भारतीय विद्यार्थी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रद्युम्न वारडे आणि भारत मुक्ती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष देवानंद निकम यांनी केले. यावेळी विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलकांनी शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधत मागण्यांचे निवेदन सादर केले. पेपरफुटीच्या घटना तत्काळ थांबवाव्यात, नीट पेपरफुटी प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करावी आणि राष्ट्रीय परीक्षा समितीच्या कामकाजाचीही चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली. खासगीकरण थांबवून समान शिक्षण व्यवस्था लागू करण्याची मागणी शिक्षण संस्थांचे खासगीकरण थांबवून खासगी क्षेत्रातही आरक्षण लागू करावे, राष्ट्रीय शिक्षण धोरणात विद्यार्थीहिताचा विचार करून आवश्यक बदल करावेत आणि देशभरात समान शिक्षण व्यवस्था लागू करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. याशिवाय केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांतील रिक्त पदांवर नवीन नोकरभरती करावी, २०११ पूर्वी सेवेत दाखल झालेल्या शिक्षकांच्या टीईटी परीक्षेबाबत योग्य निर्णय घ्यावा, अशा मागण्याही करण्यात आल्या. आंदोलकांनी निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा मुद्दाही उपस्थित केला. ईव्हीएमच्या माध्यमातून होणाऱ्या निवडणुका अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह पद्धतीने घेण्यासाठी आवश्यक सुधारणा कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित मारहाणीची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

विद्यार्थी, पालक आणि मान्यवरांचा सहभाग आंदोलनात बहुजन मुक्ती पार्टीचे राज्य प्रभारी सुमित्र अहिरे, सुनील देहडे, खुशाल सोनवणे, भारतीय विद्यार्थी मोर्चाचे राज्य प्रभारी प्रा. डॉ. प्रकाश कांबळे, विद्यार्थी समितीचे प्रा. डॉ. एस.एस. राणे, इंजि. डी.एन. पाटील, प्रा. एन.व्ही. भारंबे, आकाश लोंढे, सुमित भालेराव, मुकेश सावकारे, मयूर तायडे, मनोहर तायडे, विश्वजित तायडे, देवराज भालेराव, सम्यक गायकवाड, स्वप्निल गजरे, रोहन तायडे, राकेश बारेला, संघरत्न बाविस्कर, शुभम अहिरे यांच्यासह विद्यार्थी सहभागी झाले. तसेच विद्यार्थी व पालक प्रतिनिधी दिलीप सपकाळे, प्रा. किसन हेरोळे, प्रा. श्रीकांत तायडे, प्रा. चंद्रशेखर अहिरराव, रविंद्र मोरे, कैलास मसाने, रमेश थाटे, त्र्यंबक सोनवणे, अशोक तिडके, सुनील सोनवणे, मनोहर कोचुरे, किशोर तायडे, तबन ह्याळिंगे, अशोक बाविस्कर, आर.बी. परदेशी, भीमराव नन्नवरे, मोरसिंग राठोड, महेंद्र साळवे, ॲड. आनंद कोचुरे, इंजि. दिलीप तासखेडकर, दिलीप इंगळे, डी.एम. भालेराव, प्रभाकर मोरे, देविदास पारधे, मल्हारी सरदार, डॉ. शाकीर शेख, लंकापती भालेराव, अकील कासार, रविंद्र बाविस्कर, किशोर चौधरी, विजय सुरवाडे आदींसह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते



### आंदोलकांच्या प्रमुख मागण्या

- पेपरफुटीच्या घटना तत्काळ थांबवाव्यात.
- नीट पेपरफुटी प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करावी.
- शिक्षण संस्थांचे खासगीकरण थांबवावे.
- खासगी क्षेत्रातही आरक्षण लागू करावे.
- देशात समान शिक्षण व्यवस्था लागू करावी.
- केंद्र व राज्य स्तरावरील रिक्त पदांवर भरती करावी.
- राष्ट्रीय शिक्षण धोरणात विद्यार्थीहिताचे बदल करावेत.
- राष्ट्रीय परीक्षा समितीची उच्चस्तरीय चौकशी करावी.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

# धुळ्यात महामार्गावर दोन वाहनांना भीषण आग

## कंटेनर आणि गाजराचा आयशर जळून खाक



जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** मुंबई–आग्रा महामार्गावर धुळे जिल्ह्यात एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या ठिकाणी वाहनांना भीषण आग लागल्याने मोठी खळबळ उडाली. बाबळे फाट्याजवळ कार घेऊन जाणाऱ्या कंटेनरला आग लागून त्यातील पाच कार जळून खाक झाल्या, तर दुसऱ्या घटनेत पळासनेरजवळ गाजर घेऊन जाणारा आयशर ट्रक सिमेंटच्या कठड्याला धडकून पलटी झाल्यानंतर आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. दोन्ही घटनांमध्ये लाखो रुपयांचे नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, शिरपूरहून धुळ्याच्या दिशेने जाणाऱ्या कंटेनरला बाबळे फाट्याजवळ अचानक भीषण आग लागली. या कंटेनरमधून कारची वाहतूक केली जात होती. आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केल्याने कंटेनरमधील पाच कार आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्या. आगीमुळे वाहनांमधून मोठ्या प्रमाणात धुराचे लोट परिसरात पसरले होते. घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळविले. या कारवाईमुळे कंटेनरमधील काही वाहने वाचविण्यात यश आले, मात्र पाच कार जळून खाक झाल्याची माहिती आहे. गाजर वाहतूक करणारा आयशर पलटी दुसरी घटना पळासनेरजवळ घडली. मध्य प्रदेशातून शिरपूरच्या दिशेने गाजर घेऊन येणारा आयशर ट्रक महामार्गावरील सिमेंटच्या कठड्याला धडकला. धडकेनंतर ट्रक पलटी झाला आणि त्याला अचानक भीषण आग लागली.

आगीने काही वेळातच संपूर्ण आयशर ट्रकला वेढले. अग्निशामक दलाने घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचे प्रयत्न केले. महामार्गावर वाहतूक कोंडी एकाच दिवशी महामार्गावरील दोन वेगवेगळ्या ठिकाणी वाहनांना आग लागल्याने घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली. आगीमुळे महामार्गावर काही काळ मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

पोलिसांनी आणि संबंधित यंत्रणांनी परिस्थिती नियंत्रणात आणत वाहतूक सुरळीत केली. दोन्ही घटनांमध्ये वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सुदैवाने या दोन्ही दुर्घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झालेली नाही. वाहनांना आग नेमकी कोणत्या कारणामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून संबंधित यंत्रणांकडून पुढील तपास सुरू आहे.

# गटारीत जिवंत नवजात बालिका; पोलिसांच्या तत्परतेने उपचारासाठी दाखल

जन सम्राट टाईम्स

**सोयगाव | (प्रतिनिधी)**

सोयगाव तालुक्यातील जंगलातांडा येथील बसस्थानकाजवळील गटारीत गुरुवारी (२० ऑगस्ट) पहाटे जिवंत नवजात बालिका आढळून आल्याने खळबळ उडाली. नागरिकांना बाळाच्या रडण्याचा आवाज ऐकू आल्यानंतर त्यांनी परिसरात शोध घेतला असता अंदाजे तीन ते चार तासांची ही नवजात बालिका गटारीत आढळून आली. घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते गजानन पवार यांनी तत्काळ फर्दापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर मोटे यांना माहिती दिली. पोलिसांनी विलंब न करता घटनास्थळी धाव घेत नवजात बालिकेला उपचारासाठी सोयगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. आशा सेविकेने केली प्राथमिक मदत पोलिस पोहोचेपर्यंत उपस्थित नागरिकांनी आशा सेविका उषाबाई राठोड यांना घटनास्थळी बोलावले. त्यांनी नवजात बालिकेला स्वच्छ करून प्राथमिक मदत केली. त्यानंतर पोलिसांच्या मदतीने सकाळी सुमारे सात वाजता



बालिकेला ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अभिजीत पाटील आणि परिचारिका एम. आर. हिवर्डे यांनी बालिकेवर प्राथमिक उपचार केले. सामाजिक कार्यकर्ते डॉ. केतन काळे यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. बालिकेला पुढील उपचारांची आवश्यकता असल्याने आशा सेविका आणि महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत तिला छत्रपती संभाजीनगर येथील सामान्य रुग्णालयात पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले.

अज्ञात व्यक्तीचा शोध सुरू दरम्यान, नवजात बालिकेला गटारीत कोणी आणि कोणत्या कारणातून सोडले, याबाबत अद्याप माहिती समोर आलेली नाही. या घटनेमुळे परिसरात मोठी चर्चा सुरू झाली असून, पोलिसांकडून संबंधित व्यक्तीचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे. या घटनेच्या वेळी फर्दापूर पोलीस ठाण्याचे सपोनि सुधीर मोटे, राहुल नेवरे, संतोष उबाळे यांच्यासह ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते. नवजात बालिकेची प्रकृती आणि तिला गटारीत सोडण्यामागील कारण याबाबत पोलिस तपासानंतर अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

# माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त परभणीत सद्भावना शपथ

## राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक सलोखा मजबूत करण्याचा

जन सम्राट टाईम्स

**परभणी। (प्रतिनिधी):** भारताचे माजी पंतप्रधान व भारतरत्न राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त २० ऑगस्ट हा दिवस देशभरात 'सद्भावना दिवस' म्हणून साजरा करण्यात आला. त्यानिमित्त परभणी जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सद्भावना शपथ देण्यात आली. देशाची एकता व अखंडता कायम राखण्यासोबतच सामाजिक सलोखा आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. विविध धर्म, भाषा, प्रांत आणि समुदायातील नागरिकांमध्ये परस्पर सहिष्णुता, बंधुभाव व सौहार्दाची भावना वाढीस लागावी, हा सद्भावना दिवस साजरा करण्यामागील प्रमुख उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



कार्यक्रमाला उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक ऐक्य अधिक दृढ करण्यासाठी योगदान देण्याची प्रतिज्ञा केली.

निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सद्भावना शपथ देण्यात आली. देशाची एकता व अखंडता कायम राखण्यासोबतच सामाजिक सलोखा आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.आधुनिक भारताच्या निर्मितीत राजीव गांधींचे योगदान राजीव गांधी यांनी देशाच्या विकासात आधुनिक तंत्रज्ञान, संगणकीकरण आणि दूरसंचार क्षेत्राला चालना देण्यावर विशेष भर दिला. तसेच युवकांना राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी त्यांनी विविध उपक्रमांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचे आणि विचारांचे स्मरण करून देशातील सामाजिक ऐक्य अधिक मजबूत करण्याचा संकल्प करण्यात आला. सद्भावना दिवसाच्या निमित्ताने जात, धर्म, भाषा किंवा प्रादेशिकतेच्या भिंती बाजूला ठेवून नागरिकांनी परस्परांमध्ये प्रेम, बंधुभाव आणि शांततेची भावना वृद्धिंगत करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

# ग्रामसेवकांच्या बहिष्कारामुळे माळेगावची ग्रामसभा वादळी!

जन सम्राट टाईम्स

**सोयगाव । प्रतिनिधी:** शिवराम जाधव | दि. २० : सोयगाव तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत माळेगाव पिंपरीची नियोजित ग्रामसभा ग्रामसेवकांच्या अनुपस्थितीमुळे व कोरमअभावी वादळी ठरली. ग्रामसेवक संघटनेने २० ऑगस्टच्या ग्रामसभांवर बहिष्कार टाकल्याने ग्रामपंचायत प्रशासनासमोर पेच निर्माण झाला. अखेर गणपूर्ती पूर्ण न झाल्याने ग्रामसभा तहकूब करण्यात आली. पारोळा तालुक्यातील एका ग्रामसेवकाचा ग्रामसभेदरम्यान दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामसेवक संघटनेने राज्यभर २० ऑगस्ट रोजी आयोजित ग्रामसभांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतल्याची माहिती देण्यात आली. त्याचा परिणाम माळेगाव पिंपरी ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेवरही झाला. PMAY यादीचे केवळ वाचन ग्रामसेवक अनुपस्थित असल्याने ग्रामसभेतील प्रशासकीय कामकाजावर परिणाम झाला. उपस्थित सरपंचांनी ग्रामस्थांच्या मागणीवरून प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) अंतर्गत पात्र लाभार्थ्यांच्या यादीचे वाचन केले. मात्र यादीला अधिकृत मंजुरी देता आली नाही. ग्रामसेवक अनुपस्थित असल्याने यादीच्या मंजुरीची प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. तसेच ग्रामसभेसाठी आवश्यक कोरम पूर्ण न झाल्याने कोणताही ठराव मंजूर करता आला नाही. ग्रामस्थांमध्ये नाराजी महत्त्वाच्या विषयांवर निर्णय घेण्यासाठी ग्रामसभा आयोजित करण्यात आली असतानाच ग्रामसेवकांच्या अनुपस्थितीमुळे आणि अपुऱ्या कोरममुळे सभा तहकूब झाल्याने उपस्थित ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली. PMAY लाभार्थी यादीसह ग्रामपंचायतीच्या विविध विषयांवर चर्चा होऊन निर्णय होण्याची अपेक्षा असताना केवळ यादीचे वाचन करून सभा पुढे नेता आली नाही. अखेर आवश्यक गणपूर्ती पूर्ण न झाल्याने ग्रामसभा तहकूब करण्यात आल्याची माहिती सरपंचांनी दिली. आता पुढील ग्रामसभा कधी घेण्यात येणार आणि PMAY लाभार्थी यादीला अधिकृत मंजुरी कधी मिळणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# ग्रामसभेत ग्रामस्थांचा संताप

जन सम्राट टाईम्स

**बोदवड | प्रतिनिधी:** तालुक्यातील शिरसाळा येथे २० ऑगस्ट रोजी झालेल्या ग्रामसभेत गावातील विविध मूलभूत प्रश्नांवरून ग्रामस्थांनी प्रशासनाला धारेवर धरले. पाणीपुरवठा, सार्वजनिक शौचालये, रस्ते-गटारी तसेच पुलाच्या निकृष्ट कामावरून ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. प्रलंबित प्रश्नांवर वारंवार मागणी करूनही ठोस कार्यवाही होत नसल्याने ग्रामसभेत संतापाचा उद्रेक झाला. प्रश्नांची सरबत्ती सुरू असताना काही काळ वातावरणही तापले. ग्रामसभा सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली होती. यावेळी आजी-माजी पदाधिकारी, पोलीस पाटील, ग्रामपंचायत कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मात्र, संबंधित प्रशासनातील इतर अधिकारी उपस्थित नसल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली. अनियमित पाणीपुरवठ्यावरून संताप गावातील अनियमित पाणीपुरवठ्याचा प्रश्न ग्रामस्थांनी ग्रामसभेत उपस्थित केला. सार्वजनिक शौचालयांमध्ये पाण्याची सुविधा नसून काही ठिकाणी पाण्याच्या टाक्याही उपलब्ध नसल्याचे ग्रामस्थांनी निदर्शनास आणून दिले. यापूर्वीही या प्रश्नावर मागणी करूनही अद्याप आवश्यक सुविधा उपलब्ध न झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केले. सार्वजनिक शौचालयांमध्ये स्वच्छतेचा अभाव असून परिसरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असून प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी करण्यात आली. रस्ते आणि गटारींची दुरवस्था गावातील रस्ते व गटारींचीही दुरवस्था झाल्याचा मुद्दा ग्रामस्थांनी मांडला. मुख्य चौकात गटारीचे सांडपाणी थेट रस्त्यावर वाहत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. सांडपाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. निकृष्ट पुलाच्या कामाची चौकशी करण्याची मागणी मागासवर्गीय वस्तीतून जाणाऱ्या रस्त्यावर काही दिवसांपूर्वी करण्यात आलेल्या पुलाच्या कामाच्या दर्जावरही ग्रामस्थांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पुलाच्या आजूबाजूचा भराव वाहून गेल्याचे निदर्शनास आणून देत संबंधित कामाची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. "पुलाचे काम निकृष्ट असल्याचे निदर्शनास येत असेल, तर संबंधित ठेकेदारावर कारवाई होणार का?" असा थेट सवाल ग्रामस्थांनी प्रशासनाला केला. विकासकामांमध्ये गुणवत्तेचे निकष पाळले जात नसतील,जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणीही करण्यात आली. 'आश्वासन नको, प्रत्यक्ष काम हवे' ग्रामसभेत मांडण्यात आलेल्या प्रश्नांवर केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष काम झालेले दिसले पाहिजे, अशी आक्रमक भूमिका ग्रामस्थांनी घेतली. वारंवार प्रश्न मांडूनही अपेक्षित कार्यवाही होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी असल्याचे दिसून आले.

# आदिवासी हक्क अधिकार परिषदेच्या नियोजनासाठी वंचित बहुजन आघाडीची बैठक

## जाहीर सभेच्या आयोजनासह विविध विषयांवर पदाधिकाऱ्यांची सविस्तर चर्चा

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा | प्रतिनिधी :** वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आगामी आदिवासी हक्क अधिकार परिषद आयोजित करण्याच्या पार्श्वभूमीवर पाचोरा येथे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. येत्या १२ सप्टेंबर रोजी पाचोरा येथे वंचित बहुजन आघाडी प्रणित एकलव्य वंचित आघाडीच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी हक्क अधिकार परिषदेचे आयोजन करण्यात येणार असून, या परिषदेच्या नियोजनाबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीला वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष ईश्वर पाटील (लाला सर) यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्ह्यातील संघटनात्मक बांधणी, आदिवासी समाजाचे हक्क व अधिकार तसेच परिषद यशस्वी करण्यासाठी करावयाच्या नियोजनावर पदाधिकाऱ्यांनी विचारविनिमय केला. यावेळी जिल्ह्याचे उपाध्यक्ष हरिश्चंद्र सोनवणे, जिल्हा सचिव प्रा. प्रीतीलाल पवार, जिल्हा उपाध्यक्ष अनिल लोंढे, जिल्हा महासचिव अमित तडवी, पाचोरा तालुकाध्यक्ष संदीप जाधव,



चाळीसगाव तालुकाध्यक्ष संदीप कांबळे, पाचोरा तालुका महासचिव असलम तडवी, महासचिव अमोल अहिरे, तालुका उपाध्यक्ष मनोज अहिरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आदिवासी हक्कांच्या प्रश्नांवर होणार चर्चा आदिवासी समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि त्यांच्या हक्क-अधिकारांबाबत जनजागृती करण्यासाठी १२ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या परिषदेला मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहावे, यासाठी व्यापक नियोजन करण्याचे बैठकीत ठरविण्यात आले. परिषदेसाठी गावपातळीवर संपर्क मोहीम राबविणे, कार्यकर्त्यांची जबाबदारी निश्चित करणे तसेच कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत आवश्यक तयारी करण्यावर चर्चा झाली. याशिवाय वंचित बहुजन आघाडीचे ज्येष्ठ नेते ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या जाहीर सभेच्या आयोजनाच्या संदर्भातही बैठकीत चर्चा झाल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. आगामी काळातील संघटनात्मक कार्यक्रम आणि पक्षाच्या भूमिकेबाबतही उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीत पाचोरा व परिसरातील आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर संघटितपणे आवाज उठविण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. परिषदेला यशस्वी करण्यासाठी सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी ऋषिकेश तायडे, शाहरुख तडवी, अझरुद्दीन तडवी, अयोदिन तडवी यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# कामातील निष्काळजीपणा भोवला; जळगाव महावितरणचे अधीक्षक अभियंता विनोद पाटील निलंबित

## ६७ कोटींची थकबाकी आणि वीजचोरीच्या २,१६९ प्रकरणांवर कारवाई न केल्याचा ठपका

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी:** जळगाव महावितरण मंडलातील वाढते रोहित्र बिघाड, कोट्यवधी रुपयांची थकीत वीजबिलांची रक्कम आणि वीजचोरीच्या हजारो प्रकरणांमध्ये अपेक्षित कायदेशीर कारवाई न केल्याचा ठपका ठेवत जळगाव मंडलाचे अधीक्षक अभियंता विनोद चंद्रकांत पाटील यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. कोकण प्रादेशिक विभागाचे सह व्यवस्थापकीय संचालक तथा सक्षम अधिकारी दिलीप ज्ञा. जगदाळे यांनी १९ ऑगस्ट २०२६ रोजी निलंबनाचे आदेश जारी केले. या कारवाईमुळे महावितरणच्या वर्तुळात खळबळ उडाली आहे. निलंबन आदेशात जळगाव मंडलातील विविध गंभीर बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे. पाटील यांच्या कार्यक्षेत्रातील चोपडा शहरी उपकेंद्रातील १० एमव्हीए क्षमतेच्या पॉवर ट्रान्सफॉर्मरमध्ये गंभीर अंतर्गत बिघाड आढळून आला होता. तपासणीदरम्यान ट्रान्सफॉर्मरच्या बुकोज रिलेमधून ज्वलनशील वायू बाहेर पडल्याचे तसेच शॉर्टसर्किट चाचणी असमाधानकारक असल्याचे निदर्शनास आल्याचे आदेशात नमूद आहे. रोहित्र नादुरुस्तीचे प्रमाण दुपटीहून अधिक महावितरणच्या नियमांनुसार रोहित्र नादुरुस्तीचे प्रमाण नियंत्रणात ठेवणे अपेक्षित असताना जळगाव मंडलातील परिस्थिती चिंताजनक असल्याचे समोर आले.




रोहित्र नादुरुस्तीचे प्रमाण १०.२६ टक्क्यांपर्यंत वाढले होते. या वाढत्या बिघाडावर प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात प्रशासन अपयशी ठरल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. रोहित्रांमध्ये वारंवार बिघाड होत असल्याने ग्रामीण तसेच शहरी भागातील वीजपुरवठ्यावर परिणाम होण्याबरोबरच ग्राहकांना गैरसोयीला सामोरे जावे लागत होते. त्यामुळे देखभाल आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. ६७ कोटींची थकीत वीजबिले जळगाव मंडलासमोरील आणखी एक गंभीर बाब म्हणजे थकीत वीजबिलांची वाढती रक्कम.जुलै २०२६ अखेर तब्बल ६७ कोटी १४ लाख रुपयांची थकबाकी असल्याचे निलंबन आदेशातून स्पष्ट झाले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात महसूल थकीत असतानाही अपेक्षित वसुलीची कार्यवाही प्रभावीपणे न केल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. वीजचोरीच्या २,१६९ प्रकरणांवर कारवाई नाही मंडलाच्या कार्यक्षेत्रात वीजचोरीची ३,१६४ प्रकरणे उघडकीस आली होती. त्यापैकी तब्बल २,१६९ प्रकरणांमध्ये दंडात्मक किंवा कायदेशीर कारवाई करण्यात आली नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. वीजचोरीसारख्या गंभीर प्रकरणांमध्ये कारवाई न झाल्याने महावितरणच्या महसुलावर तसेच शिस्तीवर परिणाम झाल्याचे मानले जात आहे. रोहित्र बिघाडावर नियंत्रण न ठेवणे, थकीत महसूल वसुलीत अपेक्षित कामगिरी न करणे आणि वीजचोरीच्या प्रकरणांवर आवश्यक कारवाई न करणे, या विविध बाबींची एकत्रित दखल घेत अधीक्षक अभियंता विनोद पाटील यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. निलंबन काळात मुख्यालय सोडण्यास मनाई निलंबनाच्या कालावधीत विनोद पाटील यांना मुख्यालय सोडण्यास पूर्वपरवानगीशिवाय मनाई करण्यात आली आहे. तसेच नाशिक परिमंडळातील मुख्य अभियंता कार्यालयात आठवड्यातून सोमवार आणि शुक्रवार सकाळी १० वाजता हजेरी नोंदविणे बंधनकारक करण्यात आले आहे. महावितरणच्या वरिष्ठ पातळीवरून झालेल्या या कारवाईमुळे जळगाव मंडलातील प्रशासन आणि कार्यपद्धतीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, पुढील काळात वीजवसुली, रोहित्र देखभाल आणि वीजचोरीविरोधातील कारवाईला अधिक गती देण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# संत मुक्ताई पालखी आगमन सोहळ्यानेमुक्ताईनगरदुमदुमले

जन सम्राट टाईम्स

**मुक्ताईनगर | प्रतिनिधी:** आषाढी वारीनिमित्त पंढरपूरला गेलेल्या संत मुक्ताई पालखी सोहळ्याचे मंगळवारी, १८ ऑगस्ट २०२६ रोजी मुक्ताईनगरमध्ये उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात आगमन झाले. पालखीच्या स्वागतासाठी शहरवासीयांनी केलेली जय्यत तयारी, वारकऱ्यांचा उत्साह आणि हरिनामाच्या गजराने संपूर्ण मुक्ताईनगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली. श्री संत मुक्ताई अंतर्धान समाधीस्थळ श्रीक्षेत्र कोथळी येथून २४ जून रोजी आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे प्रस्थान केलेली संत मुक्ताईंची पालखी प्रदीर्घ प्रवासानंतर मंगळवारी स्वगृही परतली. पालखी आगमनाचे औचित्य साधून पालखी सोहळा उत्सव समिती आणि पंचक्रोशीतील नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागातून भव्य वारकरी सांप्रदायिक दिंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

१२० भजनी मंडळांनी फुलविला भक्तीचा मळा

नवीन मुक्ताई मंदिरापासून जुने मंदिर, श्रीक्षेत्र कोथळीपर्यंत आयोजित दिंडी स्पर्धेत तब्बल १२० भजनी मंडळांनी सहभाग घेतला. बाल, महिला आणि पुरुष अशा तीन गटांत झालेल्या या स्पर्धेत वारकऱ्यांनी अभंग गायन, टाळ-मृदंगाचा गजर, पावल्या आणि फुगड्यांच्या माध्यमातून भक्तीचा अनोखा आविष्कार सादर केला. दिंडीतील वारकऱ्यांचा उत्साह, पारंपरिक वेशभूषा आणि शिस्तबद्ध सादरीकरणामुळे संपूर्ण पालखी मार्गावर भक्तिमय वातावरण निर्माण झाले. शेकडो वर्षांची वारकरी परंपरा जपत झालेल्या या सोहळ्यामुळे मुक्ताईनगरी अक्षरशः हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेली. प्रत्येक भजनी मंडळाचा सन्मान स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येक भजनी मंडळाला विधान परिषद आमदार नंदकिशोर महाजन यांच्या वतीने प्रोत्साहनपर १ हजार १ रुपयांचे बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. दिंडी स्पर्धेचे परीक्षण शिवशंकर महाराज लांडे, संजय महाराज पाटणकर आणि काशिनाथ महाराज फोकमारे यांनी केले.

जन सम्राट टाईम्स — सत्याचे प्राईम्स — ब्रेक न्यूज — ज

# जळगावातील वकिलाची साडेसात लाखांची फसवणूक

## बिटकॉईनमधून ३६० टक्के परताव्याचे आमिष

जन सम्राट टाईम्स




**जळगाव | प्रतिनिधी :** रशियन कंपनीचे समभाग भारतात विक्रीस उपलब्ध झाल्याचा बनाव रचत तसेच युरो-डॉलर ट्रेडिंग आणि बिटकॉईनच्या माध्यमातून दरमहा तब्बल ३६० टक्क्यांपर्यंत परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवत जळगावातील एका ५७ वर्षीय वकिलाची ७ लाख ६० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पुण्यातील दोघांविरुद्ध जळगाव सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी विसांजी नगरातील वकील विजय बाबुलाल दाणेज (वय ५७) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, संशयितांनी विविध कागदपत्रे, कथित जागतिक करारनामे, कंपनीच्या संचालकांची ओळखपत्रे तसेच वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्याचे सांगितलेल्या बातम्यांचा आधार घेत त्यांचा विश्वास संपादन केला. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, ६ जून २०१६ ते २८ मार्च २०२० या कालावधीत संबंधित व्यवहार करण्यात आले. रशियन कंपनीचे शेअर्स, युरो-डॉलर ट्रेडिंग आणि बिटकॉईनमध्ये गुंतवणूक केल्यास मोठ्या प्रमाणात परतावा मिळेल, असे सांगून दाणेज यांना गुंतवणुकीस प्रवृत्त करण्यात आले. खात्यावर दिसला आभासी नफा संशयितांनी बिटकॉईन खरेदी आणि गुंतवणुकीच्या नावाखाली दाणेज यांच्याकडून ७ लाख १० हजार रुपये घेतल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. सुरुवातीला त्यांना ३७२ डॉलर कमिशन देण्यात आले. मोठा नफा झाल्याचे आभासी स्वरूपात दाखविण्यात आले. मात्र, प्रत्यक्षात खात्यावर दिसणारी रक्कम काढण्याचा प्रयत्न केल्यानंतर ती काढता येत नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचा संशय बळावला. दाणेज यांनी गुंतवलेली रक्कम परत मागण्यास सुरुवात केली. पैसे मागितल्यावर धमकीचा आरोप रक्कम परत मागितल्यानंतर संशयितांकडून 'एन्काउंटर' करण्याची धमकी देण्यात आल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे आर्थिक फसवणुकीसोबतच धमकीचा प्रकारही समोर आल्याने प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. निमानाथ सोनार आनंद परदेशी यांच्याविरुद्ध जळगाव सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऑनलाइन गुंतवणुकीतून कमी कालावधीत अवास्तव परतावा देण्याचे आमिष दाखवून नागरिकांची फसवणूक करण्याचे प्रकार वाढत असताना या घटनेने पुन्हा एकदा सावधगिरीचा इशारा दिला आहे. अनोळखी व्यक्ती किंवा संस्थेच्या माध्यमातून होणाऱ्या ऑनलाइन गुंतवणुकीपूर्वी संबंधित कंपनी आणि गुंतवणूक यंत्रणेची अधिकृत माहिती तपासणे आवश्यक असल्याचे पोलिसांकडून आवाहन करण्यात येत आहे.

# ३५-४० वर्षांचा संघर्ष अखेर संपला; १३६ बदली कामगार कायम सेवेत!

## आमदार अनुप अग्रवाल यांच्या पाठपुराव्याला यश

जन सम्राट टाईम्स




**धुळे। प्रतिनिधी:** धुळे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात गेल्या ३५ ते ४० वर्षांपासून बदली कामगार म्हणून सेवा बजावणाऱ्या १३६ कामगारांना कायमस्वरूपी सेवेत घेण्याचा निर्णय झाल्याने कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नासाठी आमदार अनुप अग्रवाल यांनी वरिष्ठ स्तरावर सातत्याने पाठपुरावा केल्याने अखेर या कामगारांना न्याय मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. या निर्णयानंतर कायम झालेल्या १३६ बदली कामगारांनी आमदार अनुप अग्रवाल यांच्या कार्यालयात जाऊन त्यांचा जंगी सत्कार केला. अनेक वर्षांचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागल्याबद्दल कामगारांनी आमदारांचे आभार मानत कृतज्ञता व्यक्त केली. वर्षानुवर्षे सेवेत, मात्र कायमस्वरूपी नियुक्तीची प्रतीक्षा धुळे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात १३६ कामगार गेल्या तीन ते चार दशकांपासून बदली कामगार म्हणून कार्यरत होते. दीर्घकाळ सेवा बजावूनही त्यांना कायमस्वरूपी सेवेत घेण्याचा प्रश्न प्रलंबित होता. या प्रश्नासंदर्भात वेळोवेळी वरिष्ठ स्तरावर प्रस्ताव पाठविण्यात आले; मात्र विविध कारणांमुळे त्यावर अंतिम निर्णय होत नव्हता. कामगारांच्या या प्रश्नाची आमदार अनुप अग्रवाल यांनी दखल घेतली. त्यांनी संबंधित विभाग तसेच वरिष्ठ पातळीवर सातत्याने पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. अखेर शासनस्तरावर या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याने १३६ कामगारांच्या कायमस्वरूपी सेवेचा मार्ग मोकळा झाला. कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण कायमस्वरूपी सेवेत समावेश झाल्यानंतर कामगारांनी आमदार अनुप अग्रवाल यांच्या कार्यालयात जाऊन त्यांचा सत्कार केला. या वेळी अनेक कामगारांनी आपल्या प्रदीर्घ संघर्षाला अखेर यश मिळाल्याची भावना व्यक्त केली. वर्षानुवर्षे महानगरपालिकेच्या आरोग्य सेवेत योगदान देणाऱ्या कामगारांना आता सेवासुरक्षेसह कायमस्वरूपी सेवेत काम करण्याची संधी मिळणार असल्याने त्यांच्या कुटुंबीयांमध्येही समाधानाचे वातावरण आहे. शासनाचेही मानले आभार यावेळी आमदार अनुप अग्रवाल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे आभार व्यक्त केले. शासनाच्या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या कामगारांच्या प्रश्नाला न्याय मिळाला असल्याचे त्यांनी सांगितले.

# अल्पवयीन मुलीचा बालविवाह; अत्याचारप्रकरणी चौघांना अटक

## एरंडोल तालुक्यातील आडगाव येथील घटना

जन सम्राट टाईम्स



**एरंडोल । (प्रतिनिधी):** एरंडोल तालुक्यातील आडगाव येथे १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विवाह लावून देत तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी कासोदा पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी चौघांनाही अटक केली असून, घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित मुलगी अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही तिचा विवाह कमलाकर रमेश भिल याच्यासोबत लावून देण्यात आला. विवाहानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचा आरोप असून, त्यातून ती गर्भवती झाली. त्यानंतर ६ ऑगस्ट २०२६ रोजी तिने नवजात बालकाला जन्म दिल्याचे तपासात समोर आले आहे. चौघांविरुद्ध गुन्हा दाखल या प्रकरणी कासोदा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS), पॉक्सो कायदा तसेच बालविवाह प्रतिबंधक अधिनियमाच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात दिलीप देवचंद गोकुळ, कमलाकर रमेश भिल, रमेश कौतिक भिल आणि नबाबाई भिल यांना आरोपी करण्यात आले आहे. पोलिसांनी गुरुवारी, २० ऑगस्ट रोजी पहाटे १२.५५ वाजता चौघांना अटक केली. बालविवाहाविरोधात कायद्याची कठोर अंमलबजावणी अल्पवयीन मुलीचा विवाह लावून देणे हा कायद्याने गुन्हा आहे. त्यातच अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराच्या आरोपामुळे प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. त्यामुळे पोलिसांकडून या घटनेचा सखोल तपास करण्यात येत आहे. दरम्यान, अल्पवयीन मुलींचे विवाह रोखण्यासाठी प्रशासन आणि पोलिसांकडून जनजागृती केली जात असतानाच अशा प्रकारची घटना घडल्याने बालविवाह प्रतिबंधक यंत्रणेच्या कार्यक्षमतेबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. पुढील तपास सुरू प्रकरणाचा पुढील तपास कासोदा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक श्रीकांत अंकुश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. तपासादरम्यान घटनेशी संबंधित अन्य बाबी तसेच आरोपींची भूमिका तपासली जात असून, कायद्यानुसार पुढील कारवाई केली जात आहे. अल्पवयीन मुलीच्या सुरक्षिततेचा आणि तिच्या हक्कांचा प्रश्न ऐरणीवर आणणाऱ्या या घटनेने बालविवाहासारख्या सामाजिक प्रथांविरोधात अधिक प्रभावी जनजागृती आणि कठोर कारवाईची गरज अधोरेखित केली आहे.

# ट्रॅक्टर-दुचाकीच्या भीषण धडकेत तरुण ठार; दोघे गंभीर जखमी

जन सम्राट टाईम्स

**जामनेर । प्रतिनिधी:** जामनेर तालुक्यातील फतेहपूरजवळ चिंचोली-शेवगेपिंप्री रस्त्यावर ट्रॅक्टर आणि दुचाकीची समोरासमोर भीषण धडक होऊन २२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला, तर दोघे गंभीर जखमी झाले. ही दुर्घटना १८ ऑगस्ट रोजी सायंकाळच्या सुमारास घडली. अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शेवगेपिंप्रीकडून चिंचोलीच्या दिशेने स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर (एमएच १९, ईपी ७५६६) जात होता. त्याचवेळी चिंचोलीकडून शेवगेपिंप्रीच्या दिशेने दुचाकी (एमएच १९, एएम ६६९९) येत होती. चिंचोली-शेवगेपिंप्री रस्त्यावर दोन्ही वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात दुचाकीस्वार रमजान भिकन तडवी (वय २२, रा. शेवगेपिंप्री) यांना गंभीर दुखापत झाली. त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघाताची तीव्रता एवढी होती की दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले. दोघे गंभीर जखमी या दुर्घटनेत समीर अलाऊद्दीन तडवी (वय २२) आणि रहेमान गफूर तडवी (वय २५), दोघेही रा. शेवगेपिंप्री, हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. दरम्यान, या दुर्घटनेमुळे शेवगेपिंप्री परिसरात शोककळा पसरली आहे. जळगाव येथे शवविच्छेदन मयत रमजान तडवी यांच्या मृतदेहाचे जळगाव येथील सामान्य रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. दरम्यान, अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. वाहनचालकांची माहिती तसेच अपघाताच्या परिस्थितीचा तपास करण्यात येत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी करीत आहेत.

# 'गजर ५' मधून ७०० विद्यार्थ्यांना औद्योगिकप्रशिक्षणाचेमार्गदर्शन

## एआय क्षेत्रातील संधींबाबत मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स


**जळगाव | प्रतिनिधी:** जिल्हा पेठ, जयकिसनवाडी येथील पॅशन सॉफ्टवेअरच्या वतीने औद्योगिक प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'गजर ५' या विशेष कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रविवारी (१६ ऑगस्ट) आयोजित या कार्यक्रमात जळगाव जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील सुमारे ७०० विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्य, संगणक प्रोग्राम लेखन, प्रत्यक्ष सराव, प्रकल्प निर्मिती आणि करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाला जळगाव विमानतळाचे संचालक हर्ष त्रिपाठी, शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रसाद चौधरी, पॅशन सॉफ्टवेअरचे संचालक मनोज कुमावत आणि एचआर अपूर्वा कुमावत यांची प्रमुख उपस्थिती होती. औद्योगिक क्षेत्रातील करिअरच्या संधींची माहिती हर्ष त्रिपाठी यांनी विद्यार्थ्यांना विमानतळावरील औद्योगिक भेटीच्या अनुभवाच्या आधारे विमानतळावरील विविध विभाग, त्यांचे कार्य तसेच विमान वाहतूक क्षेत्रातील उपलब्ध करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांची जळगाव विमानतळावरील औद्योगिक भेट यापूर्वीच पूर्ण झाली असल्याने त्या भेटीदरम्यान मिळालेल्या अनुभवांवरही यावेळी चर्चा करण्यात आली. प्रसाद चौधरी यांनी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार औद्योगिक प्रशिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले. केवळ पुस्तकी किंवा सैद्धांतिक ज्ञान पुरेसे नसून, प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि तांत्रिक कौशल्यांचा विकास विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. प्रोग्रामिंगसह प्रकल्प निर्मितीवर भर मनोज कुमावत यांनी विद्यार्थ्यांना १२ आठवड्यांच्या औद्योगिक प्रशिक्षणातील विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रशिक्षणादरम्यान घेण्यात येणाऱ्या तांत्रिक चाचण्या, संगणक प्रोग्राम लेखन, प्रत्यक्ष सराव आणि प्रकल्प स्पर्धेबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. सध्याच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संधी निर्माण होत असून, विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणासोबत अद्ययावत तंत्रज्ञानाचे ज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण संकल्पनांवर आधारित प्रकल्प तयार करून आपल्या कौशल्याला व्यावसायिक स्वरूप द्यावे, असेही त्यांनी सांगितले. प्रत्यक्ष प्रशिक्षणाचा विद्यार्थ्यांना फायदा औद्योगिक प्रशिक्षणार्थी शिवम माळी याने प्रशिक्षणाबाबत समाधान व्यक्त केले. पॅशन सॉफ्टवेअरमध्ये कंपनीचे प्रत्यक्ष कामकाज, प्रकल्पांची निर्मिती, संगणक प्रोग्राम लेखन आणि प्रत्यक्ष ज्ञानावर भर दिला जात असल्याने या प्रशिक्षणाचा विद्यार्थ्यांना मोठा फायदा होत असल्याचे त्याने सांगितले.

# महिला बचत गटाच्या सीआरपीला अधिकाऱ्यांकडून त्रास?

## रेशन दुकान चालविण्यासाठी पैशांची मागणी केल्याचा गंभीर आरोप

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** महिला बचत गटाच्या सीआरपी म्हणून कार्यरत असलेल्या महिलेला तहसील कार्यालयासह जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेतील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून मानसिक त्रास दिला जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, या मागणीसाठी शिंदखेडा तालुक्यातील एका महिलेने जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन सादर केले आहे. न्याय न मिळाल्यास आत्मदहन करण्याचा इशाराही या महिलेने प्रशासनाला दिला आहे. शिंदखेडा तालुक्यातील वरझडी येथील




### जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन

आपल्याला त्रास देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी, तसेच प्रलंबित मानधन मिळवून द्यावे, अशी मागणी निर्मला माळी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.तक्रारीची दखल घेऊन प्रशासनाने तातडीने चौकशी करावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. न्याय मिळाला नाही तर आत्मदहन करण्याचा इशारा दिल्याने प्रशासनासमोर या प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले आहे. दरम्यान, महिलेने केलेले अधिकारी व कर्मचाऱ्यांवरील आरोप हे चौकशीतून स्पष्ट होणे आवश्यक असून, संबंधित प्रशासनाची बाजूही समोर येणे अपेक्षित आहे. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते बापू बागुल, निर्मला माळी आदी उपस्थित होते.

निर्मला माळी या साईबाबा महिला बचत गटाशी संबंधित असून, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या उमेद अभियानाच्या माध्यमातून सीआरपी म्हणून कार्यरत असल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

मात्र, या पदावर काम करूनही गेल्या दीड वर्षापासून मानधन मिळालेले नाही, असा त्यांचा दावा आहे. महिला बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. त्यासाठी सीआरपी म्हणून काम करणाऱ्या महिलांवर बचत गटांच्या मार्गदर्शनासह विविध जबाबदाऱ्या सोपविल्या जातात. निर्मला माळी यांनीही आपल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या; मात्र दीर्घकाळ मानधन प्रलंबित असल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. एकीकडे सीआरपी पदाचे मानधन थकीत असताना दुसरीकडे रेशन दुकान चालविण्यासाठी संबंधित वरिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून पैशांची मागणी करण्यात आल्याचा गंभीर आरोप निर्मला माळी यांनी केला आहे. या प्रकारामुळे आपल्याला मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. या आरोपांमुळे संबंधित विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित झाले असून, प्रशासनाने या तक्रारीची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी पुढे आली आहे.

# मलकापूर नगर परिषदेत जन्म-मृत्यू दाखल्यांसाठी नागरिकांचे हेलपाटे; मंजुरी प्रक्रियेतील दिरंगाईवर संताप

## वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

**मलकापूर। प्रतिनिधी:** मलकापूर नगर परिषदेत जन्म-मृत्यू दाखला मिळविण्यासाठी नागरिकांना वारंवार कार्यालयाचे हेलपाटे मारावे लागत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करूनही दाखला मंजुरीच्या प्रक्रियेत विलंब होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. जन्म-मृत्यू दाखला हा नागरिकांच्या दैनंदिन तसेच शासकीय कामकाजासाठी अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज आहे. शैक्षणिक प्रवेश, वारसाहक्क, विविध शासकीय योजनांचा लाभ, विमा, बँकिंग तसेच इतर प्रशासकीय प्रक्रियांसाठी या दाखल्याची आवश्यकता भासते. मात्र, हा महत्त्वाचा दस्तऐवज मिळविण्यासाठी नागरिकांना नगर परिषद कार्यालयाच्या वारंवार पायऱ्या झिजवाव्या लागत असल्याचे चित्र असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. कागदपत्रे पूर्ण, तरीही मंजुरीला विलंब? जन्म-मृत्यू दाखल्यासाठी आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतरही संबंधित प्रकरणांची मंजुरी वेळेत होत नसल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे अर्जदारांना आपल्या प्रकरणाची स्थिती जाणून घेण्यासाठी पुन्हा-पुन्हा नगर परिषद कार्यालयात जावे लागत आहे.

यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैसा दोन्ही खर्च होत असून, विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगितले जात आहे. "कागदपत्रे पूर्ण असताना दाखला मिळण्यासाठी एवढा विलंब का?" असा सवाल




नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. संबंधित प्रकरणांवर वेळेत कार्यवाही होते का, मंजुरी प्रक्रियेत नेमका अडथळा कुठे आहे आणि नागरिकांना वारंवार कार्यालयात का बोलावले जाते, याबाबत स्पष्टता देण्याची मागणी होत आहे. दिरंगाईची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी शासकीय दस्तऐवजांवर वेळेत कार्यवाही करून नागरिकांना सेवा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र, याच प्रक्रियेत दिरंगाई होत असल्यास त्याची कारणे स्पष्ट होणे गरजेचे आहे. दाखले मंजूर करण्याच्या प्रक्रियेत कोणत्या स्तरावर प्रकरणे प्रलंबित राहतात, याची तपासणी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. दाखला मिळविण्यासाठी नागरिकांना वारंवार कार्यालयात येण्याची वेळ येत असल्याने नगर परिषदेच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित झाले आहेत. नागरिकांच्या वेळेची आणि गैरसोयीची दखल घेऊन प्रशासनाने जन्म-मृत्यू दाखल्यांची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण करण्याची मागणी होत आहे. प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढा नगर परिषदेकडे प्रलंबित असलेली जन्म-मृत्यू दाखल्यांची प्रकरणे तातडीने निकाली काढावीत. नागरिकांना अनावश्यक हेलपाटे मारण्याची वेळ येऊ नये, यासाठी संबंधित विभागाने कार्यवाहीची निश्चित पद्धत राबवावी, अशी मागणी आहे. मंजुरी प्रक्रियेत दिरंगाई होत असल्याचे आढळल्यास त्याची जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करावी. तसेच नागरिकांना अर्जाची स्थिती आणि दाखला मिळण्याबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# भुसावळ डीआरएम कार्यालयात जगन सोनवणे यांची अधिकाऱ्यांसोबत बैठक

जन सम्राट टाईम्स



विभागीय रेल्वे व्यवस्थापक (DRM) कार्यालयात विविध प्रलंबित प्रश्नांवर कामगार नेते तथा ऑल इंडिया संविधान आर्मीचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष जगन भाऊ सोनवणे (BA, MA, LLB) आणि रेल्वे प्रशासनातील अधिकाऱ्यांमध्ये सुमारे एक तास बैठक झाली.बैठकीत झालेल्या चर्चेचा संपूर्ण अहवाल डीआरएम यांना कळविण्यात आला असून, त्यानंतर दूरध्वनीवरूनही याबाबत चर्चा झाल्याचे सांगण्यात आले. यावेळी कंडारी येथील कार्यकर्ते, नांदुरा येथील नगरसेवक अजय भिडे, तसेच बुऱ्हाणपूर (मध्य प्रदेश) आणि भुसावळ येथील कार्यकर्ते उपस्थित होते. विविध भागांतील प्रश्न प्रशासनाच्या निदर्शनास आणून देत त्यावर ठोस तोडगा काढण्यासाठी पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

**भुसावळ | प्रतिनिधी :** भुसावळ येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (DRM) कार्यालयात विविध प्रलंबित प्रश्नांवर कामगार नेते तथा ऑल इंडिया संविधान आर्मीचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष जगन भाऊ सोनवणे (BA, MA, LLB) आणि रेल्वे प्रशासनातील अधिकाऱ्यांमध्ये सुमारे एक तास बैठक झाली. यावेळी भुसावळ विभागातील विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. डीआरएम साहेबांच्या निर्देशानुसार ही बैठक घेण्यात आली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांसमोर भुसावळ, नांदुरा, कंडारी तसेच मध्य प्रदेशातील बुऱ्हाणपूर येथील विविध प्रश्न मांडण्यात आले. स्थानिक नागरिक व कार्यकर्त्यांच्या अडचणी तसेच प्रलंबित मागण्यांवर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली. बैठकीदरम्यान विविध मागण्यांसाठी प्रस्तावित मोर्चा आणि रेल रोको आंदोलनाबाबतही चर्चा झाली. संबंधित प्रश्नांवर प्रशासनाकडून योग्य ती कार्यवाही करण्याबाबत विचारविनिमय करण्यात आला. भुसावळ येथील

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# सात बकऱ्या अन् चार बोकडांची चोरी; १.३० लाखांचा मुद्देमाल जप्त

## चोपडा शहरातील पंचशीलनगरमध्ये घरफोडी

जन सम्राट टाईम्स

**चोपडा | प्रतिनिधी :** चोपडा शहरातील पंचशीलनगर परिसरात घरफोडी करून सात बकऱ्या आणि चार बोकड चोरीला गेल्याची घटना १९ ऑगस्ट रोजी पहाटे उघडकीस आली. या प्रकरणी चोपडा शहर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत एका संशयिताला ताब्यात घेतले असून, चोरीस गेलेला सुमारे १ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळवले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पंचशीलनगर येथील रहिवासी अरुण दत्तू बाविस्कर (वय ४५) यांच्या जुन्या मातीच्या बंद घराला लागून असलेल्या घराच्या लाकडी दरवाजाची कडी तोडून चोरट्याने आत प्रवेश केला.

त्यानंतर घराच्या मागील बाजूस दोरीच्या दावणीने बांधलेल्या सात बकऱ्या आणि चार बोकड चोरून नेण्यात आले. १.३० लाखांचा मुद्देमाल चोरीस चोरीस गेलेल्या सात बकऱ्यांची अंदाजे किंमत ७० हजार रुपये, तर चार बोकडांची किंमत सुमारे ६० हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार एकूण १ लाख ३० हजार रुपयांचा पशुधनाचा मुद्देमाल चोरीस गेला होता. घटना लक्षात आल्यानंतर तक्रारदाराने पोलिसांशी संपर्क साधला. त्यानंतर चोपडा शहर पोलिसांनी प्रकरणाचा तपास सुरू केला. संशयिताला ताब्यात घेतले तपासादरम्यान पोलिसांना सचिन एकनाथ सपकाळे (वय ३५, रा. भिलवाडा, चोपडा) याच्यावर संशय बळावला. पोलिसांनी



त्याला ताब्यात घेत चौकशी केली. त्याच्याकडून चोरीस गेलेल्या सात बकऱ्या आणि चार बोकडांचा संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे चोरीला गेलेले पशुधन परत मिळाल्याने तक्रारदाराला दिलासा मिळाला आहे. चोपडा शहरातील पंचशीलनगर परिसरात घरफोडी करून सात बकऱ्या आणि चार बोकड चोरीला गेल्याची घटना १९ ऑगस्ट रोजी पहाटे उघडकीस आली. या प्रकरणी चोपडा शहर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत एका संशयिताला ताब्यात घेतले असून, चोरीस गेलेला सुमारे १ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळवले आहे. कलम ३३१(४), ३०५(अ) अन्वये गुन्हा या प्रकरणी चोपडा शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३१(४) आणि ३०५(अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चोरीमागील नेमका उद्देश तसेच या घटनेत आणखी कोणाचा सहभाग आहे का, याबाबत पोलीस तपास करीत आहेत. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक युवराज वाळुंज यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. घटनेतील अन्य बाबींचा तपास करून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

# विज्ञान मेळाव्यात गायत्री माळी तालुक्यात प्रथम 'भारतीय ऊर्जा क्षेत्र २०४७

## भवितव्य विषयावरील वक्तृत्व स्पर्धेत उल्लेखनीय यश

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव। प्रतिनिधी:** अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा २०२६ अंतर्गत 'भारतीय ऊर्जा क्षेत्र २०४७ : भवितव्य आणि आव्हाने' या विषयावर आयोजित तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु. गायत्री लिलाधर माळी हिने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावत घवघवीत यश संपादन केले. ही तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा सा. दा. कुडे माध्यमिक विद्यालय, धरणगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी ऊर्जा क्षेत्रातील बदल, भविष्यातील ऊर्जेची वाढती गरज, पर्यायी ऊर्जास्रोत तसेच आगामी आव्हाने यावर आपले विचार मांडले. गायत्री माळी हिने विषयाचा सखोल अभ्यास करून प्रभावी आणि आत्मविश्वासपूर्ण वक्तृत्वातून भारतीय ऊर्जा क्षेत्राच्या भविष्यातील वाटचालीवर प्रकाश टाकला. बदलत्या काळानुसार पारंपरिक ऊर्जास्रोतांसोबतच सौर, पवन यांसारख्या पर्यायी



ऊर्जास्रोतांचा वापर वाढविण्याची गरज तसेच ऊर्जा बचतीचे महत्त्व तिने आपल्या भाषणातून अधोरेखित केले. तिच्या प्रभावी सादरीकरणाने परीक्षकांची मने जिंकली आणि तिने प्रथम क्रमांक मिळविला. गायत्रीला विद्यालयातील विज्ञान शिक्षिका तथा पर्यवेक्षिका भारती पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली गायत्रीने स्पर्धेची तयारी केली. विद्यालयाकडून अभिनंदन गायत्रीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालयाचे चेअरमन डी. जी. पाटील, सचिव सी. के. पाटील आणि मुख्याध्यापिका सुरेखा पाटील यांनी तिचे अभिनंदन केले. तसेच तिच्या पुढील शैक्षणिक व वैज्ञानिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या यशामुळे इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालयाच्या शैक्षणिक तसेच विज्ञानविषयक उपक्रमांच्या यशात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, वक्तृत्वकौशल्य आणि समकालीन विषयांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विद्यालयाकडून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचेही यावेळी कौतुक करण्यात आले. अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा २०२६ अंतर्गत 'भारतीय ऊर्जा क्षेत्र २०४७ : भवितव्य आणि आव्हाने' या विषयावर आयोजित तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु. गायत्री लिलाधर माळी हिने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावत घवघवीत यश संपादन केले.


# राज्यातील ७० हजार सोसायट्यांच्या 'डीम्ड कन्व्हेअन्स'चा मार्ग मोकळा!

## स्वयंपुनर्विकासासाठी प्रोत्साहन व करसवलतींची अंमलबजावणी

जन सम्राट टाईम्स

**मुंबई। (प्रतिनिधी):** राज्यातील हजारो सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या 'डीम्ड कन्व्हेअन्स'च्या प्रश्नाला आता गती मिळण्याची शक्यता आहे. राज्यातील सुमारे १ लाख १५ हजार नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांपैकी ६० ते ७० हजार सोसायट्यांचे अद्याप डीम्ड कन्व्हेअन्स झालेले नाही. ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी मालमत्ता पत्रक अथवा सातबारा उताऱ्यावरील 'इतर हक्क' सदरी थेट संबंधित गृहनिर्माण संस्थेच्या नावाची नोंद करण्याबाबत महसूल विभागाने पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत.

गृहनिर्माण संस्थांचा स्वयंपुनर्विकास आणि महसूल विभागाशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीत आमदार प्रवीण दरेकर आणि आमदार संजय केळकर यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सोसायट्यांच्या समस्यांवर चर्चा करून धोरणात्मक निर्णय घेण्याच्या



सूचना यावेळी देण्यात आल्या. ६० ते ७० हजार सोसायट्यांना दिलासा राज्यात मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण संस्था अस्तित्वात असल्या तरी अनेक सोसायट्यांना अद्याप जमिनीचा मालकी हक्क सोसायटीच्या नावावर अधिकृतरीत्या हस्तांतरित करून घेता आलेला नाही. डीम्ड कन्व्हेअन्सच्या अभावामुळे पुनर्विकासासह विविध कामांमध्ये अडथळे निर्माण होतात. ही प्रक्रिया जलद आणि सुलभ करण्यासाठी सहकार, महसूल, जमाबंदी आणि नोंदणी महानिरीक्षक (IGR) विभागांच्या समन्वयाने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांच्या मालमत्ता पत्रकावर किंवा सातबारा उताऱ्यावरील इतर हक्कांमध्ये सोसायटीच्या नावाची नोंद करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर २०१९च्या शासन निर्णयानुसार इतर करांमध्ये सवलत तसेच १० टक्के प्रोत्साहन (इन्सेन्टिव्ह) देण्याच्या अंमलबजावणीसाठी कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले. स्वयंपुनर्विकासासाठी आवश्यक असलेल्या 'वर्क कॉन्ट्रॅक्ट' आणि 'डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट'चा सुटसुटीत नमुना तयार करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. वित्त विभागाकडून अपेक्षित चार टक्के सवलतीसाठी गृहनिर्माण विभागाने तातडीने प्रस्ताव सादर करावा, तसेच नोंदणी महानिरीक्षकांकडून आवश्यक स्पष्टता घेण्याचे निर्देश देण्यात आले. म्हाडा सोसायट्यांवरील कराबाबतही स्पष्टता म्हाडामधील सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी शासनाने यापूर्वीच अकृषिक कर रद्द केला आहे. मात्र, काही ठिकाणी अद्याप हा कर वसूल केला जात असल्याची बाब बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आली.

# निंभोरा परिसरातून गाय चोरीला; निंभोरा पोलिसांत गुन्हा दाखल

जन सम्राट टाईम्स


**रावेर। प्रतिनिधी:** रावेर तालुक्यातील निंभोरा बुद्रुक परिसरातील शिवारा भागात गोठ्याजवळ बांधून ठेवलेली सुमारे ६६ हजार रुपये किमतीची गाय अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. ही घटना २९ जुलै रोजी सायंकाळपासून ३० जुलै रोजी सकाळपर्यंतच्या कालावधीत घडली. याप्रकरणी निंभोरा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निंभोरा बुद्रुक येथील लक्ष्मण गोविंदा बोंडे (वय ६५) हे मजुरीचे काम करतात. त्यांच्या मालकीची गाय निंभोरा परिसरातील शिवारा भागात असलेल्या गायींच्या गोठ्याजवळ बांधण्यात आली होती. २९ जुलै रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजेनंतर अज्ञात चोरट्याने संधी साधून गोठ्याजवळ बांधलेली गाय चोरून नेल्याचा संशय आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजेच्या सुमारास गाय जागेवर नसल्याचे बोंडे यांच्या लक्षात आले. त्यांनी परिसरात तसेच आजूबाजूच्या भागात गायीचा शोध घेतला. मात्र, बराच शोध घेऊनही गाय आढळून न आल्याने अखेर पोलिसांत धाव घेत तक्रार दाखल करण्यात आली. ६६ हजार रुपयांची गाय लंपास चोरीस गेलेल्या गायीची अंदाजे किंमत ६६ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. ग्रामीण भागात पशुधन हे शेतकरी आणि मजुरांच्या उपजीविकेचा महत्त्वाचा आधार असताना गाय चोरीला गेल्याने संबंधित कुटुंबाचे आर्थिक नुकसान झाले आहे. लक्ष्मण बोंडे यांच्या फिर्यादीवरून निंभोरा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) नुसार चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चोरट्याचा शोध सुरू घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तपासाला सुरुवात केली असून, चोरीस गेलेल्या गायीचा तसेच अज्ञात चोरट्याचा शोध घेण्यासाठी विविध दिशेने तपास सुरू आहे. परिसरातील संभाव्य ठिकाणांची माहिती घेतली जात असून, गायीला कुठे नेण्यात आले याचा शोध घेण्याचे प्रयत्न पोलिसांकडून सुरू आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल अविनाश पाटील करीत आहेत.

# सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह दीड लाखांची रोकड लंपास

## अज्ञात चोरट्याविरुद्ध निंभोरा पोलिसांत गुन्हा

जन सम्राट टाईम्स

**रावेर| प्रतिनिधी:** रावेर तालुक्यातील खिर्डी बुद्रुक येथे बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करत सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण १ लाख ५० हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना १८ ऑगस्ट रोजी सकाळी ते दुपारच्या दरम्यान घडली. याप्रकरणी निंभोरा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडी व चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खिर्डी बुद्रुक येथील शेतकरी प्रदीप अशोक महाजन (वय ३२) हे कुटुंबासह राहत असून, १८ ऑगस्ट रोजी सकाळी ८ ते दुपारी १.३० वाजेच्या सुमारास त्यांचे घर बंद होते. हीच संधी साधत अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाजाचे कुलूप तोडले आणि घरात प्रवेश केला. घरात प्रवेश केल्यानंतर चोरट्याने कपाटाची पाहणी करून त्यामध्ये ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. घरातील साहित्य अस्ताव्यस्त केल्यानंतर चोरटा पसार झाला. दागिन्यांसह १ लाख २७ हजारांची रोकड चोरीस गेलेल्या मुद्देमालामध्ये सुमारे ३ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या लहान मुलांच्या कानातील बाळ्या, तसेच २० ग्रॅम वजनाचे चांदीचे कडे व चैन यांचा समावेश आहे. याशिवाय घरात ठेवलेली तब्बल १ लाख २७ हजार रुपयांची रोख रक्कम चोरट्याने लंपास केली.




सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड असा एकूण १ लाख ५० हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. घरफोडीची घटना लक्षात आल्यानंतर तक्रारदाराने तातडीने पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर निंभोरा पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला. परिसरातील संशयास्पद हालचाली तसेच चोरट्याचा माग काढण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे. अज्ञात चोरट्याचा शोध सुरू प्रदीप महाजन यांच्या फिर्यादीवरून निंभोरा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५(अ) आणि ३३१(३) अन्वये घरफोडी व चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चोरीच्या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये काही प्रमाणात चिंता व्यक्त होत असून, बंद घरांना लक्ष्य करणाऱ्या चोरट्याचा पोलिसांनी तातडीने शोध घ्यावा, अशी मागणी होत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ममता तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून विविध दिशेने तपास केला जात असून, परिसरातील माहिती आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे चोरट्यापर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# पारंपरिक आणि भक्तिमय वातावरणात रंगणार कानबाई माता उत्सव

## खानदेशी संस्कृती, श्रद्धा आणि कौटुंबिक एकत्रीकरणाचा अनोखा सोहळा

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** खानदेशची संस्कृती, परंपरा आणि लोकजीवनाचा सळसळता उत्साह अनुभवायला देणारा कानबाई माता उत्सव यंदा रविवार, २३ ऑगस्ट २०२६ रोजी मोठ्या भक्तिभावाने साजरा होणार आहे. खानदेशातील अनेक कुटुंबांचे श्रद्धास्थान असलेल्या कानबाई मातेच्या उत्सवानिमित्त घराघरांत धार्मिक विधी, आकर्षक सजावट, नैवेद्य आणि पारंपरिक रोटांचा कार्यक्रम रंगणार आहे. कानबाई माता ही खानदेशातील अनेक कुटुंबांची कुलदैवत मानली जाते. श्रावण महिन्यात साजरा होणारा हा उत्सव केवळ धार्मिक विधीपुरता मर्यादित नसून खानदेशी संस्कृती, लोकपरंपरा आणि कौटुंबिक एकत्रीकरणाचा महत्त्वपूर्ण सोहळा मानला जातो. नोकरी, व्यवसाय किंवा शिक्षणानिमित्त बाहेरगावी गेलेले कुटुंबीयही या उत्सवानिमित्त आपल्या मूळ गावी एकत्र येतात. कानबाई उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी किंवा शनिवारी माताजींच्या मूर्तीची अथवा प्रतीकात्मक घटाची विधिवत स्थापना केली जाते. त्यानंतर घरातील वातावरण भक्तिमय होते. माताजींसाठी आकर्षक मखर, फुले आणि विविध सजावटींची तयारी केली जाते. माताजींसमोर अखंड दिवा प्रज्वलित केला जातो. उत्सवाच्या काळात घरातील महिला व



कुटुंबीय धार्मिक विधी, पूजाअर्चा आणि नैवेद्याची तयारी करतात. पारंपरिक पद्धतीने होणाऱ्या या विधींमधून खानदेशातील जुन्या लोकपरंपरांचे जतन होताना दिसते. रविवार, २३ ऑगस्ट हा यंदाच्या उत्सवातील मुख्य दिवस असून या दिवशी 'रोटांचा कार्यक्रम' होणार आहे. कानबाई मातेच्या पूजेमध्ये रोटांच्या नैवेद्याला विशेष महत्त्व आहे. गव्हाच्या पिठापासून तयार केलेले जाडसर रोट पारंपरिक पद्धतीने भाजले जातात. रोट तयार करताना स्वच्छता आणि धार्मिक शुचिता यांना विशेष महत्त्व दिले जाते. घरातील महिला व कुटुंबीय पारंपरिक पद्धतीने रोटांचा नैवेद्य तयार करतात. त्यानंतर सगेसोयरे, नातेवाईक, मित्र आणि शेजाऱ्यांना महाप्रसादासाठी आमंत्रित केले जाते. त्यामुळे रोटांचा कार्यक्रम हा धार्मिक श्रद्धेबरोबरच सामाजिक सलोखा आणि आपुलकी वाढविणारा सोहळा ठरतो. उत्सवाच्या सांगतेच्या दिवशी माताजींची पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढली जाते. ढोल-ताशांचा गजर, अहिराणी लोकगीते आणि कानबाई मातेच्या जयघोषाने परिसर दुमदुमून जातो. 'कानबाई चालली सासरला...' अशा भावनिक आणि पारंपरिक गीतांनी वातावरण भक्तिमय होते. यानंतर नदी किंवा जलाशयात विधिवत माताजींचे विसर्जन केले जाते. या वेळी भाविकांकडून श्रद्धेने निरोप देण्यात येतो.

### परंपरेच्या संवर्धनाचा उत्सव

आधुनिक जीवनशैलीत अनेक बदल झाले असले तरी खानदेशातील कानबाई उत्सवाने आपली पारंपरिक ओळख आजही जपली आहे. घराघरांत होणारी पूजा, रोटांचा नैवेद्य, नातेवाईकांचे एकत्र येणे, अहिराणी लोकगीतांची परंपरा आणि सामूहिक मिरवणूक यामुळे हा उत्सव खानदेशच्या लोकसंस्कृतीचे जिवंत दर्शन घडवतो.